**शिक्षण विभाग माध्यमिक**
**यशवंतराव चव्हाण भवन (जुनी इमारत)**
**पुणे जिल्हा परिषद पुणे सोमवार पेठ पुणे ०१**

कार्या दुरध्वनी-०२०-२६०५०७३३ मेल आयडी- rmsapunezp@gmail


जाक्र.जिप/शिक्षण/माध्य/ ५१५८ /२०२३ दि. २२/६/२०२३

**प्रति,**

१. अध्यक्ष/सचिव, पोदार इंटरनॅशनल स्कुल ,दौंड,ता.दौंड,जि.पुणे
२. मुख्याध्यापक,पोदार इंटरनॅशनल स्कुल दौंड ता.दौंड जि.पुणे

**विषय- स्वयंअर्थसहायित तत्वावर नवीन,दहावी शाळेस प्रथम मान्यता देणेबाबत**

संदर्भ-१.महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियम अधिनियम-२०१२
२.शासन मान्यता पत्र क्र एसएफएस-१०१८/प्रक्र १५४२/एसएम-२ दि.२३ जानेवारी २०१९
३.मा.शिक्षण उपसंचालक पुणे यांचेकडील पत्र जाक्र.शिउसं/प्राथ२०२/मान्यता/पुवि/२०१९-२०२०/८८७५दि.१३ डिसेंबर २०१९
४.संबधित शाळेकडील प्रस्ताव **दि. ३१/५/२०२३**
५.मा.उपशिक्षणाधिकारी यांचा तपासणी अहवाल दिनांक १३/५/२०२३ नस्ती प्राप्त दि.३१/५/२०२३

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की आपल्या संस्थेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम -२०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेस संदर्भ क्र २ अन्वये शासन पत्र देण्यात आलेले आहे. त्यानुसार विहित कालावधीत वर्ग सुरु करुन त्यांना प्रथम मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव आपण संदर्भ क्र .४ अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेला होता. आपले प्रस्तावानुसार शाळेने पुढीलप्रमाणे वर्ग सुरु केलेले असून सदर वर्गाना खाली नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन /परिपत्रक क्रमांक | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | शिक्षण मंडळ | मान्यता वर्ग इय-ता व शाखा | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| शासन मान्यता पत्र क्र एसएफएस-१०१८/प्रक्र १५४२/एसएम-२ दि.२३ जानेवारी २०१९ | पोदार इंटरनॅशनल स्कुल दौंड ता.दौंड,जि.पुणे | पोदार इंटरनॅशनल स्कुल ता.दौंड,जि.पुणे | इंग्रजी | सी.बी.एस.सी (नविनशाळा ) | इ. ९ वी च्या वर्गास प्रथम मान्यता | २०२१-२०२२ पासून |

**<u>अटी व शर्ती</u>**

१.सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदीची व त्या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या सर्व नियमांची पुर्तता करणे आवश्यक आहे.
२.परवानगी देण्यात आलेल्या शाळेस,(अ) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच (ब)महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.
३.संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम , शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी व मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल
४.U-Dise (Unified District Information System for Education ) यु-डाईस कोड प्राप्त करुन घेणे व दरवर्षी त्यामधील माहिती अदयावत करणेची जबाबदारी संबंधित संस्था/शाळेची राहील.
५.सर्व संबधिताच्या माहितीसाठी **स्वयंअर्थसहायित तत्वावरील नवीन परवानगी प्राप्त शाळा** असा जाहीर फलक शाळेच्या प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.
६.जे वर्ग सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.
७.SARAL (Systematic Administrative Reforms for Achievment of Learning By Students) सरल प्रणालीवर( शाळा, विदयार्थी शिक्षक इत्यादी बाबतची ) माहिती भरणे व ती वेळोवेळी अदयवात करणे आवश्यक राहील.
८.शाळेतील आवश्यक सर्व नोंदी व अभिलेखे अदयावत ठेवून ते वेळोवेळी प्रमाणित करुन घ्यावेत.

९.वर्गामध्ये विहित प्रवेश क्षमतेच्या मर्यादेत विदयार्थ्यांना प्रवेश दयावेत पटपडताळणी/संचमान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

१०.शाळेत पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नियुक्ती शसनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार करावी.

११.शाळेतील नियुक्त मुख्याध्यापक अथवा शिक्षकांना खाजगी शिकवणी वर्गामध्ये काम करता येणार नाही याची दक्षता घ्यावी.

१२.व्यवस्थापकीय संस्था ही विहित केलेले नियम ,मानके व प्रमाणकांनुसार शाळा चालविली जात असल्याची खात्री करुन घेईल व दर्जेदार शिक्षण देण्यास बांधील येईल.

१३.शासनाचे वतीने एखादया अधिका-यास आवश्यक असेल तेव्हा कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत केव्हाही शाळेत प्रवेश करता येईल व तिची तपासणी करता येईल.

१४.याव्दारे ज्या वर्गाना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्यात आली आहे त्यांना भविष्यात कधीही शासकीय अनुदान तसेच कोणत्याही प्रकारचे आर्थिक साहाय्य देय असणार नाही.

१५.शालेय शुल्क निश्चित करताना महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क (विनियमन )अधिनियम -२०११ आणि महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध)अधिनियम-१९८७ मधील तरतूदी तसेच शासनाने वळोवेळी विहित केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करावे

१६.शाळा बंद करणे शासनाने किमान अठरा महिन्यांची पूर्वसूचना दिल्याखेरीज स्वयंअर्थसहायित तत्वावर स्थापन केलेली शाळा बंद करता येणार नाही.

१७.एखादया शाळेने त्यांना लागू असलेल्या कायदयातील कोणत्याही तरतूदीचे किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा शासनाने निर्धारित केलेली प्रमाणके किंवा मानके किंवा अटी व शर्तीची पूर्तता करणे थांबविल्यास विदयार्थ्यांच्या हिताला बाधा पोचविणारी कृती केल्यास किंवा दर्जाहिन शैक्षणिक कामगिरी केल्यास शाळेची मान्यता /परवानगी काढून घेण्यात येईल.

१८.जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४/२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबीची पुर्तता करावी.

a) शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.(Fire Audit)

b) शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

c) शाळेच्या संबधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

d) सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधलेली असल्याची खात्री करावी.

e) प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.(Structural Audit)

f) ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकषांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

१९.संदर्भ क्र.२ शासन मान्यता पत्र दिनांक २३/०१/२०१९ व संदर्भ क्र.३ शिउसं पत्र दि.१३/१२/२०१९ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन माध्यमिक शाळा संहिता कलम-४ अन्वये सदर मान्यता देण्यात येत आहे.

२०.सदरची मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पुढील पाच वर्षाकरिता लागू असेल त्यानंतर कायम मान्यता घेण्यात यावी .शाळेची प्रगती विचारात घेउन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करणेत येईल

२१.पाच वर्षाच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल. मात्र शाळेने या आदेशातील व इतर कायदयाने घालून दिलेल्या तसेच शासनाने वेळोवेळी विहित अटी व शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

२१.६.२३

( सुनंदा वाखारे)
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
**पुणे जिल्हा परिषद पुणे**

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.
१.मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे
२.विभागीय सचिव पुणे विभागीय शिक्षण मंडळ शिवाजीनगर पुणे

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/464/2020
पुणे 1 दिनांक :-5 /10/2020

प्रति,

**अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,**
**पोदार चॅरिटी ट्रस्ट मुंबई संचलित पोदार इंटरनॅशनल स्कूल गट नं 107/1 सोनवडी पाटस रोड दौंड ता दौड जि.पुणे**

**विषय:-** सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

***संदर्भ*** :- 1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र 1, 6 व 24) 2013
2.शासन निर्णय क्रमांक जा.क्र. एसएसएफ-1018/प्र.क्र.1542/एसएम-2 ,दिनांक-23/1/2019
3.शिक्षण उपसंचालक,पुणे जा.क्र.शिउंस/प्राथ-202/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/2019-20/8875, दिनांक-13.12.2019

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तीवर विद्यमान प्राथमिक शाळेस प्राथमिक ते उच्च प्राथमिक इ. 1 ली ते इ.8 वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे .**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नोव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 9 |
| 1 | **पोदार चॅरिटी ट्रस्ट मुंबई** | **पोदार इंटरनॅशनल स्कूल गट नं 107/1 सोनवडी पाटस रोड दौंड ता दौड जि.पुणे** | इंग्रजी | नवीन शाळा (सी.बी..एस.ई) | प्राथमिक ते उच्च प्राथमिक इ.1 ली ते इ.8 वी | २०१८-१९ |

## अटी व शर्ती

1.संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
2.शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
3.या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
4.संदर्भ क्रमांक 02 अन्वये सन 2018-19 मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे. परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5.परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6 शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
7..महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन निर्णय क्र. एसएसएफ/प्र.क्र.735/एसएम-2, दिनांक-6.8.2018 तील अटी शर्तीतील मददा क्र.2 चे पूर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9 महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

5/10/2020
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**